# नियमित दिवाणी दावा क्रमांक ४९९/२०१३ मधील निशाणी २७ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरूध्द दाखल केला आहे. वादीने अशा प्रकारे मागणी केली आहे की, न्यायीक आयोग तालुका निरीक्षक भूमि अभिलेखला निर्देश देण्यात यावे की दावा मिळकत गट कमांक १५६३ मधील हद्दी निश्चीत करून वादी व प्रतिवादीचे हिश्यांचे हद्दी व वहिवाटी व एकामेकांचे हिश्यात असणारे अतिकमण दर्शवणारे मोजणी नकाशा व अहवाल न्यायालयात सादर करावे.

२. प्रस्तुतच्या अर्जाची थोडक्यात वस्तुस्थिती अशा प्रकारे आहे की, वादी कथन करतात की तालुका निरीक्षक भूमि अभिलेखची नेमणूक न्यायीक आयोग म्हणून दावा मिळकत गट कमांक १५६३ ची मोजणी करण्यासाठी व वादीचे हिश्याचे हद्दीचे मोजणी निश्चित करण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती परंतु न्यायीक आयोगाने दाखल केलेला मोजणी अहवालामधील अभिप्राय चुकीचा आहे कारण वादी व प्रतिवादीचे ताब्यात वहिवाटीप्रमाणे असलेले क्षेत्र मोजणी मध्ये किती होते याचा खुलासा झालेला नाही व दस्त ऐवज ७/१२ उतारा प्रमाणे आणेवारी प्रमाणे क्षेत्र नमूद करणे आवश्यक होते आणि म्हणून ही चूक दुरूत करण्यासाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेखला निर्देश देणे आवश्यक आहे की त्यांनी दावा मिळकत गट क.१५६३ चे हद्दी निश्चीत करून वादी व इतर हिस्सेदारांचे खरेदीपत्रांचे कागदपत्र व चालू वहिवाटीप्रमाणे पाहणी करून न्यायीक आयोगाचा अहवाल सविस्तर मोजणी नकाशा सकट दाखल करावे. वादीने मागणी केली आहे की तालुका निरीक्षक भूमि अभिलेखला निर्देश देण्यात यावे की दावा मिळकत गट कमांक १५६३ मधील हद्दी निश्चीत करून वादी व प्रतिवादीचे हिश्यांचे हद्दी व वहिवाटी व एकामेकांचे हिश्यात असणारे अतिकमण दर्शवणारे मोजणी नकाशा व अहवाल न्यायालयात सादर करावे. म्हणून

प्रस्तुतचा अर्ज.

३. प्रतिवादी म्हणणे दाखल केलेले नाही म्हणून प्रस्तुतच्या अर्जाचे सुनावणीचे कामकाज प्रतिवादी विरूध्द म्हणण्याशिवाय चालविण्यात आले.

४. प्रस्तुतच्या अर्जाचे वस्तुस्थितीचे अवलोकन केले. वादीचे वकिलांना ऐकले. वादीचे वकिलांनी युक्तीवादात प्रतिपादन केले आहे की न्यायीक आयोगाने दाखल केलेले न्यायीक आयोगाचा अहवाल व मोजणी नकाशा हे चुकीचे आहे कारण वादी व प्रतिवादीचे वहिवाटी प्रमाणे ताब्यात असलेले वादी व प्रतिवादीच्या जमिनीच्या क्षेत्राचे मोजणीच करण्यात आलेली नाही आणि त्यामुळे अतिक्रमीत क्षेत्राची मोजणीची वस्तुस्थिती दप्तरी सदरी आलेली नाही. तसेच न्यायीक आयोगाने दिलेल्या मोजणी बाबतचा अहवाल व नकाशा सुध्दा वादीला मान्य नाही आणि म्हणून दावा मिळकत गट क्रमांक १५६३ चे वादी व प्रतिवादीच्या वहिवाटीप्रमाणे मोजणी होणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्राची वस्तुस्थिती दप्तरी सदरी येणे आवश्यक आहे आणि त्यामुळे तालुका निरीक्षक भूमि अभिलेखला निर्देश देण्यात यावे की गट क्रमांक १५६३ ची मोजणी करून हद्दी निश्चीत करून त्यामधील वादी व प्रतिवादींचे हिश्यांचे हद्दी व वहिवाट व एकामेकांच्या हिश्यात असणारे अतिक्रमणचे क्षेत्र मोजणी नकाशामध्ये स्पष्टपणे उल्लेख करावे व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल न्यायालयात सादर करावा.

५. प्रस्तुतच्या अर्जाला प्रतिवादीने म्हणणे दाखल केलेले नाही आणि म्हणून हे सिध्द होते की वादीच्या वकिलांनी अनआव्हानात्मकरित्या सिध्द केले आहे की न्यायीक आयोगाने दावा मिळकतीची मोजणी करून दाखल केलेला मोजणी नकाशा व अहवाल वादीला मान्य नाही कारण वादी व प्रतिवादीचे ताब्यामध्ये असलेले

वहिवाटीप्रमाणे मोजणी झालेली नाही आणि त्यामुळे वादी व प्रतिवादीच्या ताब्यात नक्की किती क्षेत्र भरत आहे हे मोजणीमध्ये अस्पष्ट आहे आणि म्हणून वादीला न्यायीक आयोगाचे अहवाल मान्य नसल्याने परत न्यायीक आयोगाला असे निर्देश देणे उचित होणार आहे की न्यीक आयोग तालुका निरीक्षक भूमि अभिलेखने गट कमांक १५६३ मधील हद्दी निश्चीत करून त्यामध्ये वादी व प्रतिवादीचे हिश्यांचे हद्दी व वहिवाटी व एकामेकांचे हिश्यात असणारे अतिकमणाचे क्षेत्र दर्शवणारे मोजणी नकाशा व अहवाल न्यायालयात दाखल करावे ही दाद मंजूर होण्यास पात्र आहे. मी या निष्कर्षास पोहोचले आहे की प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, उत्तरास मी खालीप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर.

२. तालुका निरीक्षक भूमि अभिलेखला निर्देश देण्यात येतो की दावा मिळकत गट कमांक १५६३ मधील हद्दी निश्चीत करून वादी व प्रतिवादीचे हिश्यांचे हद्दी व वहिवाटी व एकामेकांचे हिश्यात असणारे अतिकमण दर्शवणारे मोजणी नकाशा व अहवाल न्यायालयात सादर करावे.

३. वादीने न्यायीक आयोगाचे शुल्क रूपये २,०००/- नियमाप्रमाणे भरणा करावे.

४. येणेप्रमाणे रिट जारी करण्यात यावे.

सही/-

तारीख: १४/६/२०१६

(वै.म. गोतसुर्वे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
इस्लामपूर